

कोल्हापूर : १) दै. पुढारी व पीसीईटी आयोजित कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी तुडुंब गर्दी केली. यावेळी बोलताना विवेक वेलणकर, डॉ. आर. एस. जहागीरदार आणि डॉ. सागर पांडे. (छाया : मिलन मकानदार)

# प्रचलित करिअर वाटांच्या पलीकडे पाहा

## तज्ज्ञांचा सल्ला; 'पुढारी' व पीसीईटी आयोजित कार्यशाळेस तुडुंब गर्दी : गुणवंतांचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर केवळ डॉक्टर किंवा इंजिनिअरिंगमधील प्रचलित वाटांचा विचार न करता पलीकडे जाऊन नीट, जेईईसारख्या परीक्षांमधून उपलब्ध होणाऱ्या दुर्लक्षित; पण आकर्षक करिअर संधींचा शोध घ्यावा, असा सूर येथील शाहू स्मारक भवनात आयोजित करिअर मार्गदर्शन सेमिनारमध्ये उमटला.

बारावीनंतर पुढे काय? या यक्ष प्रश्नाने गोंधळलेल्या हजारो विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या दिशा दाखवणारा भव्य मार्गदर्शन सोहळा येथील शाहू स्मारक भवनात प्रचंड उत्साहात पार पडला. दैनिक 'पुढारी', पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या

पुढारी
PCET's Pimpri Chinchwad University
Learn | Grow | Achieve

कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी करत प्रतिसाद दिला.

भविष्यात असंख्य संधी आहेत, असा सल्ला विविध तज्ज्ञांनी दिला, तर दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांनी, नीट आणि जेईईमधूनच मिळणाऱ्या; पण फारशा चर्चेत नसलेल्या आकर्षक संधींचा खजिना विद्यार्थ्यांपुढे खुला केला. ते म्हणाले, डॉक्टर, इंजिनिअरच्या पुढेही जग आहे. आयुर्वेद, होमिओपॅथी, व्हेटर्नरी, फिजिओथेरपी, फार्मसी, आर्किटेक्चर, कृषी, फूड टेक्नॉलॉजी ते अगदी सशस्त्र दल, वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत असंख्य पर्याय तुमची वाट पाहत आहेत. यासाठी चौकटीबाहेर जाऊन विचार करा.

नूतन महाराष्ट्र ग्रुपचे आर. एस. जहागीरदार यांनी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. सर्वांनी कॉम्प्युटरच्या मागे न धावता ब्लॉक चेन, मायक्रो प्रोसेसर चिप मॅन्युफॅक्चरिंग यासारख्या भविष्यातील क्षेत्रांचा वेध घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटीचे सहायक प्राध्यापक सागर पांडे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशिन लर्निंग आणि डेटा सायन्सचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, तुमची शाखा कोणतीही असो, एआयचे ज्ञान तुम्हाला इतरांपेक्षा चार पावले पुढे ठेवेल.

या प्रेरणादायी मार्गदर्शनासोबतच गुणवंतांचा सन्मान सोहळा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

यावेळी दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये विवेकानंद महाविद्यालयाचे विश्वंभर कुलकर्णी, मंगल गवळी, न्यू कॉलेजचे डॉ. अनिल सूर्यवंशी, तसेच कुलवीर कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी नूतन महाराष्ट्र ग्रुपचे सहायक प्रा. दिग्विजय पाटील आणि दै. 'पुढारी'चे वरिष्ठइव्हेंट मॅनेजर राहुल शिंगणापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.